आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया

# आता करू या देखरेख...

# आपल्या जिल्ह्यासाठी आलेल्या आरोग्याच्या (पी.आय.पी.) बजेटवर!



- **प्रकाशक :**

साथी (Support for Advocacy and Training to Health Initiatives)
अमन टेरेस, प्लॉट नं.१४०,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे-४११०२९
फोन - (०२०) २५४५१४१३, २५४५२३२५, ६४००५५४०
E-mail : cehatpun@vsnl.com
Website : www.sathicehat.org

- **शोधसंकलन :**

हेमराज पाटील

- **मार्गदर्शन :**

डॉ. नितीन जाधव

- **मांडणी :**

शारदा महल्ले

- **अर्थसहाय्य :**

अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च,
जागतिक आरोग्य संघटना (WHO)

# प्रस्तावना

‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन’ अंतर्गत ‘सार्वजनिक आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया’मध्ये गेली ५ वर्ष आपण वेगवेगळ्या पातळ्यांवरील आरोग्यसेवांवर देखरेख करीत आहोत. या देखरेखीमुळे अनेक स्थानिक आरोग्य प्रश्न सुटायला नक्कीच सुरुवात झाली आहे. याचं श्रेय द्यायचं झालं तर देखरेख प्रक्रियेत निर्माण झालेल्या व्यासपीठांचा योग्य वापर करून स्थानिक आरोग्य यंत्रणेवर दबाव आणणाऱ्या दबावगटांना आणि या दबावाला स्थानिक आरोग्य यंत्रणेने मिळालेल्या प्रतिसादाला !

आतापर्यंतचा देखरेखीच्या अनुभवावरून, आता आपण आरोग्यसेवांवरील नियोजनामध्ये देखील काम करायला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आतापर्यंत आपण एनआरएचएम अंतर्गत विविध पातळ्यांवर येणाऱ्या रुग्ण कल्याण निधी खर्चाबद्दल माहिती गोळा केली, त्याचा अभ्यास केला आणि हा निधी लोकांच्या गरजांनुसार योग्य पद्धतीने खर्च व्हावा यासाठी काही पर्याय सुचविले. यामुळे बऱ्याच ठिकाणी या निधीचे योग्य नियोजन होऊन निधी खर्च केला जाण्याच्या प्रमाणात निश्चित सुधारणा होत आहे.

आता याचा पुढचा टप्पा म्हणून आपल्या संपूर्ण जिल्ह्यासाठी एनआरएचएम अंतर्गत येणाऱ्या निधीच्या खर्चावर देखरेख करायला हवी. यामुळे आपल्या देखरेखीचा परिघ आणखीन विस्तारला जाऊन स्थानिक व जिल्हा पातळीवर आरोग्यसेवांचे प्रश्न सोडविण्यासाठीची आणखी एक संधी उपलब्ध होऊ शकेल. तसेच स्थानिक पातळीवरील देखरेख व नियोजनामधून न सुटलेले प्रश्न वरच्या पातळीवर सोडवण्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद संपूर्ण जिल्ह्यासाठी आलेल्या निधीमधून करण्याचा प्रयत्न या देखरेखीतून करता येऊ शकतो. हे करण्यासाठी या पुस्तिकेमध्ये या वर्षासाठी आपल्या जिल्ह्याला आलेल्या एकूण निधीपैकी काही निधीच्या तरतुदीची माहिती देत आहोत.

आमची अशी आशा आहे की, ही माहिती एनआरएचएमच्या पी.आय.पी. अंतर्गत आपल्या जिल्ह्यासाठी आलेल्या निधीवर देखरेख करण्यासाठी उपयोगी पडेल आणि यामुळे लोकांसाठी आलेला निधी लोकांपर्यंत योग्य पद्धतीने पोचविण्यासाठी या देखरेखीची मदत होईल.

**एप्रिल २०१२-मार्च २०१३ या कालावधीसाठी पुणे जिल्ह्याला प्राप्त झालेले बजेट**

| क्र. | बजेटहेड | जिल्हा आरोग्य अधिकारी | जिल्हा शल्यचिकित्सक | एकूण उपलब्ध निधी (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | आर.सी.एच (RCH flexi pool) | ४ कोटी, ५९ लाख, ०८ हजार | २ कोटी, २६ लाख, ८७ हजार | ६ कोटी, ८५ लाख, ९५ हजार |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM flexi pool) | १२ कोटी, ८५ लाख, ९० हजार | २ कोटी, २८ लाख, १५ हजार | १५ कोटी, १४लाख, ०५ हजार |

**यापैकी आपण कोणत्या मुद्यांवर देखरेख करू शकतो ?**

१. अपंगांसाठी कार्यशाळा

२. आरोग्य संस्थांची नवीन बांधकामे व दुरुस्ती

३. आरोग्य विषयक जनजागृतीसाठी घ्यावयाचे उपक्रम

४. मोबाईल मेडिकल युनिट

५. टेलीमेडिसीन प्रकल्प

६. शालेय आरोग्य योजना

७. जननी सुरक्षा योजनेअंतर्गत सॅनिटरी नॅपकिनची खरेदी

८. गावपातळीवरील अबंधित निधी

**वर दिलेल्या प्रत्येक मुद्याची सविस्तर माहिती व बजेट पुढीलप्रमाणे-**

## १. अपंगांसाठी कार्यशाळा (Disability Workshops)

या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी अपंगांसाठी कार्यशाळा घेण्यासाठी ७०० स्क्वे.फूट बांधकामाच्या एका ईमारतीसाठी ३० लाख तर फर्निचर व साहित्यासाठी २० लाख असे एकूण ५० लाख रुपये Disability Workshops या बजेटखाली मंजूर झाले आहेत. याअंतर्गत किती कार्यशाळा, कधी, कोण घेणार या विषयी माहिती दिलेली नाही त्यासाठी आपल्याला जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी बोलावे लागेल.

## २. आरोग्य संस्थांची नवीन बांधकामे व दुरुस्ती

या वर्षीच्या बजेटमध्ये 'Repairs and new construction of quarters' या बजेट हेडखाली प्रा.आ. केंद्राला ३ कोटी ४ लाख ५८ हजार आणि उपकेंद्रासाठी ४७ लाख २० हजार असे एकूण मिळून ३ कोटी ५१ लाख ७८ हजार इतका निधी जिल्हा पातळीवर उपलब्ध आहे.

## ३. आरोग्य विषयक जनजागृतीसाठी घ्यावयाचे उपक्रम

या वर्षीच्या IEC/BCC या बजेटमध्ये वेगवेगळ्या विषयांवर जनजागृती करण्यासाठी २० लाख ८४ हजार निधीची तरतूद केली आहे. त्यासाठी खालील उपक्रमांचा समावेश आहे.

| क्र. | नियोजित उपक्रम | बजेट रुपये | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|
| १. | स्त्रीलिंग गर्भहत्यावर निर्बंध (पीसीपीएनडीटी- PCPNDT) आणण्याच्या कायद्याबद्दल जनजागृती कार्यक्रम | १ लाख | शल्य चिकित्सक |
| २. | आरोग्य विषयक जाणीवजागृतीसाठी फिरणाऱ्या गाडीचा खर्च | १ लाख | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ३. | Inter Personal Communication सत्र आरोग्य कर्मचारी यांच्यासाठी भारतीय कायद्या विषयक माहिती देण्यासाठीच्या कार्यशाळा | ८० हजार | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ४. | वेगवेगळ्या आजाराच्या निदानासाठी आरोग्य शिबिरे कार्यक्रम | ४ लाख | शल्य चिकित्सक |
| ५. | वेगवेगळ्या यात्रा व जत्रांमध्ये आरोग्य विषयक जाणीवजागृती कार्यक्रम - २०० कार्यक्रम | ८ लाख | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ६. | स्थानिक भाषेत आरोग्य विषयक माहिती पुस्तिका, पोस्टर्स इत्यादी माहिती संसाधनांची छपाई | ५० हजार | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ७. | पथनाट्य, लोककला, कलाजथ्था या सामाजिक प्रचार- प्रसार माध्यमांच्या मदतीने आरोग्य विषक जनजागृती कार्यक्रम | १ लाख | जिल्हा आरोग्य अधिकारी |

| क्र. | नियोजित उपक्रम | बजेट रुपये | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|
| ८. | फेरी, रॅली सामाजिक प्रचार-प्रसार माध्यमांच्या मदतीने आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम | प्रत्येक रॅलीसाठी १० हजार रुपये असे एकूण ५० हजार रुपये | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ९ | आरोग्य विषयक माहिती सांगणारी प्रदर्शने भरवण्याचा कार्यक्रम १ प्रदर्शनास २० हजार | प्रत्येक प्रदर्शना साठी २० हजार रुपये असे एकूण १ लाख | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| १० | 'आयुष' या योजनेची माहिती व बॅनर | ५४ हजार | |

## ४. मोबाईल मेडिकल युनिट

ज्या ठिकाणी आरोग्य सेवा स्थानिक आरोग्य संस्थेमार्फत देणे शक्य होत नाही त्या ठिकाणी मोबाईल (फिरते) मेडिकल युनिटद्वारा आरोग्य सेवा पोहोचवली जाते.

या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये Mobile Medical Units या बजेटहेड खाली वेगवेगळ्या निधीची तरतूद केली आहे. त्यासाठी खालील मुद्यांचा समावेश आहे.

| क्र. | तपशील | संख्या | बजेट रुपये |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (२५०००/- महिना) | १ | ३ लाख |
| २. | स्टाफ नर्स (१००००/- महिना) | १ | १ लाख २० हजार |
| ३. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (८०००/- महिना) | १ | ९६ हजार |
| ४. | फार्मासिस्ट- औषध वितरक (८०००/- महिना) | १ | ९६ हजार |
| ५ | ड्रायव्हर (६५००/- महिना) | २ | १ लाख ५६ हजार |
| ६. | वाहन देखभाल दुरुस्ती | | ६ लाख |
| ७. | साहित्य देखभाल | | ७२ हजार |
| ८. | इतर खर्च Consumables | | १ लाख २० हजार |
| ९. | औषधे | | ३ लाख ५० हजार |
| १०. | आयत्यावेळी लागणारा खर्च Emergency | | ३६ हजार |
| | मोबाईल मेडिकल युनिटवर एकूण होणारा खर्च | | १९ लाख ४६ हजार |

## ५. टेलीमेडिसिन प्रकल्प

आरोग्य संस्थांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून टेलीमेडिसन प्रकल्प उभा केला आहे. उदा. एखाद्या रुग्णाचा एक्स-रे काढला पण त्या एक्स-रे मध्ये काय आहे हे कळण्यासाठी तज्ज्ञाची गरज असते अशा वेळेस एक्स-रे काढून उपयोग नाही म्हणून काढलेला एक्स-रे ज्या ठिकाणी तज्ज्ञ आहे तिथे पाठविला जातो आणि त्यावर तज्ज्ञ आपले मत देतात. या प्रकल्पाद्वारे रुग्णाला आरोग्य सेवा दिली जाते.

या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये Telemedicine project या बजेटहेड खाली कर्मचारी मानधन आणि कार्यालयीन खर्च यासाठी ५ लाख ९४ हजार इतक्या निधीची तरतूद केली आहे. त्यासाठी खालील मुद्यांचा समावेश आहे.

| **क्र.** | **तपशील** | **संख्या** | **बजेट** |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा स्तरावरील फॅसिलिटी मॅनेजरचे पगार व प्रवासभत्ता | १ | १ लाख ९२ हजार |
| २. | उपजिल्हा रुग्णालय स्तरावरील फॅसिलिटी मॅनेजरचे पगार व प्रवासभत्ता | १ | १ लाख ६२ हजार |
| ३. | जिल्हा व उपजिल्हा रुग्णालय स्तरावरील डॉक्टरांचे मानधन (१०० रुग्ण) | १ | ४० हजार |
| ४. | Contingency to Patient nodes | २ | २० हजार |
| ५. | Connectivity expenses | २ | १ लाख ८० हजार |

## ६. शालेय आरोग्य योजना

एन.आर.एच.एम. अंतर्गत महाराष्ट्रात हा कार्यक्रम फेब्रुवारी २००८ पासून शालेय शिक्षण विभागाच्या (SSA) समन्वयाने राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व मराठी शाळा, आश्रमशाळा, अपंग मुलांची शाळा, वस्ती शाळा, शासनमान्य खाजगी-निमखाजगी आणि समाजकल्याण विभागा मार्फत ज्या मुलांना शाळांमध्ये भरती केले आहे अशा इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या मुलांनाही या योजनेचे लाभार्थी मानले जाते.

त्याचप्रमाणे २०१०-२०११ मध्ये महानगरपालिका अंतर्गत असलेले इयत्ता १ली ते ४थी या वर्गातील मुलांचीही तपासणी या योजने अंतर्गत केली जाईल असे ठरवले गेले. अशा प्रकारच्या सर्व शाळांमध्ये मुलांची तपासणी या योजने अंतर्गत केली जाते. आश्रम शाळातील मुलांच्या तपासणीसाठी २०११-२०१२ मध्ये ३७ टीम तयार केल्या गेल्या.

फक्त पुणे जिल्ह्यासाठी या वर्षीच्या बजेटमध्ये ६० लाख, ८२ हजार रुपये मंजूर झाले आहेत व खर्चाची जबाबदारी शल्य चिकित्सक यांची आहे.

**या योजनेतील महत्त्वाचे उपक्रम खालीलप्रमाणे-**

१. जिल्हा आणि तालुका पातळीवर समन्वय.

२. मासिक बैठका.

३. जिल्हा पातळीवर आश्रमशाळा टीमसाठी फर्निचर करणे.

४. जिल्हास्तरीय शालेय कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी मदत.

५. संदर्भ सेवा-तालुकास्तरीय लोकांना जिल्हास्तरावर जाण्यासाठी मदत.

६. प्रवास आणि जेवण भत्ता सोबत स्टेशनरी खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध केला जाईल.

७. पत्रकांची छपाई- जिल्हा पातळीवर.

ही योजना राबवण्यासाठी पुणे जिल्हा पी.आय.पी.च्या बजेटमध्ये ९७ लाख, ५६ हजार रुपये कर्मचारी मानधन म्हणून मंजूर झाले आहेत

| क्र. | उपक्रम | मासिक वेतन | संख्या | एकूण बजेट (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १. | फार्मासिस्ट- औषध वितरक | ८०००/- | २० | २ लाख ४० हजार |
| २. | प्रकल्प सहाय्यक | १०,०००/- | १ | २ लाख ८८ हजार |
| ३. | वैद्यकीय अधिकारी- आदिवासी भागासाठी | १८०००/- | १० | २ लाख ४० हजार |
| ३. | वैद्यकीय अधिकारी- ग्रामीण भागासाठी | १५००/- | ३० | ५४ लाख |
| ४. | औषधे- वितरक ग्रामीण व | ८०००/- | २० | १९ लाख २० हजार |

## ७. जननी सुरक्षा योजने अंतर्गत सॅनिटरी नॅपकिनची खरेदी

१. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमधील जननी सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना सॅनिटरी नॅपकिनसाठी राज्यपातळीवर २५ लाख ५१ हजार रुपयांची मंजुरी मिळालेली आहे.

२. किशोरवयीन मुला-मुलींसाठी आयर्न फॉलिक ॲसिड आणि अेलबेंडाझोल या गोळ्या खरेदी करून शिक्षक, अंगणवाडी सेविका यांना दिल्या जातात.

## ८. गावपातळीवरील अबंधित निधी

१ कोटी ४९ लाख १९ हजार हा निधी या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये Untied fund for VHSNWC या बजेटहेड खाली इतका निधी मंजूर झालेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत देण्यात येणारा गावपातळीवरील अबंधित निधी म्हणून गावातील लोकसंख्येनुसार दिला जाईल.

| क्र. | गावातील लोकसंख्या | अबंधित निधी |
|---|---|---|
| १. | ० ते ५०० | ५ हजार |
| २. | ५०१ ते १ हजार ५०० | ८ हजार |
| ३. | १ हजार ५०१ ते ५ हजार | १५ हजार |
| ४. | ५ हजार १ ते १० हजार | २४ हजार |
| ५. | १० हजार पेक्षा जास्त | ३० हजार |

■ ■ ■

# या माहितीच्या आधारे आपण काय करू शकतो?

या सगळ्या माहितीच्या आधारे आपण दोन पातळ्यांवर काम करू शकतो.

**१. स्थानिक पातळीवर**

**२. जिल्हा पातळीवर**

त्या आधी आम्हाला मिळालेल्या माहितीच्या आधारे आपल्यापर्यंत ही सगळी माहिती पोचविण्याचे प्रयत्न करीत आहोत. पण आमच्या मते ही माहिती पुरेशी नाही. त्यामुळे या माहितीच्या आधारे आपल्याला पुढील गोष्टी करण्यासाठी आम्ही सुचवित आहोत.

## १. स्थानिक पातळीवर

- वर दिलेल्या मुद्यांसंदर्भातील सद्यःस्थिती काय आहे याची माहिती गोळा करावी लागेल. त्यासाठी आपल्याला संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांबरोबर देखील बोलावं लागेल. या सगळयामधून येणारे प्रश्न आपल्याला वेगवेगळ्या पातळ्यांवर मांडावे लागतील. या सगळयामुळे पी.आय.पी मध्ये नमूद केलेल्या योजना प्रत्यक्ष कशा प्रकारे राबविल्या जात आहे ते समजेल आणि जर त्यामध्ये काही प्रश्न असतील ते पुढे येतील.
- वेगवेगळ्या बैठकांमध्ये लोकप्रतिनिधींबरोबर या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये काय तरतूद करण्यात आली आहे याची चर्चा करावी.

## २. जिल्हा पातळीवर

- जिल्हा पातळीवर देखील आपल्याला आणखीन माहिती गोळा करावी लागणार आहे. त्यासाठी सर्व प्रथम आपल्या जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर (डी. पी. एम., जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक) बोलून पी.आय.पी.ची सद्यःस्थिती काय आहे ते पाहावे व आम्ही दिलेली माहिती पडताळून पाहावी.
- जिल्हा देखरेख व नियोजन समितीच्या बैठकीमध्ये या वर्षीच्या पी.आय.पी.मध्ये काय तरतूद करण्यात आली आहे? याची मांडणी संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना करावयास सांगून त्याच्या अंमलबजावणीसाठी काय यंत्रणा उभी केली आहे? त्यावर चर्चा करावी.
- स्थानिक पातळीवर पी.आय.पी.ची अंमलबजावणी करताना पुढे आलेले आरोगय प्रश्नांवर जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्याबरोबर चर्चा करावी.
- लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेतून पुढे आलेले आरोग्य प्रश्न सोडविण्यासाठी या वर्षीच्या पी.आय.पी.तील निधीचा वापर कसा करता येऊ शकेल? यावर चर्चा करावी.

**प्रकाशन– साथी, पुणे**